


ॲनी सुलिव्हन

हेलन केलरच्या शिक्षिका

मेरी मलोने
मराठी: अश्विनी बर्वे



ॲनी सुलिव्हन

हेलन केलरच्या शिक्षिका

जेव्हा ॲनी सुलिव्हन लहान होत्या तेव्हा त्यांना कमी दिसत होते. त्या ब्रेल लिपी शिकल्या कारण त्यांना वाचता येत नसे. पण नंतर डॉक्टरांच्या मदतीने तिचे डोळे चांगले झाले.

नंतर ॲनी सुलिव्हन, हेलेन केलर च्या शिक्षक झाली. हेलन, बघू शकत नव्हती आणि ऐकूही शकत नव्हती. हेलनला शिकवणे खूप अवघड काम होते. ॲनीने ते काम खूप छान केले. हेलन केलर एक आदर्श स्त्री झाली, चांगली माणूस झाली. त्यामुळे ॲनी सुलिव्हन एक खूप चांगली शिक्षिका असल्याचे सिद्ध झाले.

घोडागाडी एका जुन्या इमारतीच्या समोर थांबली. त्यातून दोन मुलं उतरली. एक होती दहा वर्षाची ॲनी सुलिव्हन आणि दुसरा तिचा सहा वर्षाचा लहान भाऊ जिमी. ॲनीने उन्हात स्वतःचे डोळे मिचकावले, तिला त्याचा त्रास होत होता. जिमी पण अंध होता.

“आपण कुठे आहोत?" ॲनीने विचारले. “हे मॅसॅच्युसेट्स आहे, अमेरिकेतल्या एका अनाथाश्रमात ॲनी आणि जिमी राहण्यासाठी आले होते. त्यांच्या कुटुंबात त्यांचे संगोपन करण्यासाठी कोणीही जिवंत नव्हते.”



ॲनीने जिमीचा हात घट्ट पकडला. त्याला एकट्याला ती कुठेही जाऊ देणार नव्हती. त्यांना एका खोलीत नेण्यात आले. तिथे एक टेबल खुर्ची आणि एक बेड आहे. असे ॲनीने जिमीला सांगितले.



त्या काळात खूप गरीब लोक अनाथाश्रमात राहत होते. सर्व वयाच्या माणसांची तिथे गर्दी झालेली होती. काही वृद्ध होते तर काही अपंग होते.



जिमी कधीच कणखर नव्हता. तो आणि ॲनी अनाथाश्रमात गेल्यानंतर काही महिन्यांतच त्याचे निधन झाले. ॲनी खूप रडली. आता ती खऱ्या अर्थाने एकटी पडली होती.






पण अनाथाश्रमातल्या लोकांना ॲनी आवडत होती. ती उत्साही आणि स्मार्ट होती. जसजशी ती मोठी होऊ लागली तसतशी ती छान दिसू लागली. तिचे केस काळे होते आणि तिचे हसू उबदार होते. अनाथाश्रमातील मुलं म्हणत होती की अंध लोकांसाठी शाळा आहेत. ॲनी म्हणे की मला संधी मिळाली तर मी शिकेन.

एके दिवशी काही महत्त्वाचे पाहुणे तिथे आले. ॲनी धावत त्यांच्याकडे गेली आणि म्हणाली की, तिला शाळेत जायचे आहे. एका गृहस्थाने तिला मदत करण्याचे वचन दिले. त्यानंतर लवकरच, ॲनीला बोस्टन येथील 'पर्किन्स इन्स्टिट्यूशन'मध्ये जाण्यासाठी तयार होण्यास सांगण्यात आले.





ॲनीने ऐकले होते की पर्किन्समधली ही शाळा प्रसिद्ध आहे. तिथे तिला लॉरा ब्रिजमन नावाची एक मुलगी भेटली. डॉ. सॅम्युअल ग्रिडले तिथे शिकवत होते. लॉरा बघू,ऐकू आणि बोलू शकत नव्हती. ती लोकांच्या ओठावर बोटांनी "टॅप" करून संभाषण शिकत असे. लॉरा ब्रिजमन पर्किन्स मध्येच मुक्कामाला होती.




अॅनी खूप उत्साहित होती. बॉस्टनला जाणाऱ्या रेल्वेगाडीत तिने नवीन कपडे परिधान केले होते. तो ड्रेस खूपच आखूड होता आणि काळे, उंच बूट पायांना घट्ट होत होते. पण अॅनीला मात्र ते अगदी ठीक वाटले. ती चौदा वर्षांची होती आणि गेल्या चार वर्षांपासून ती एका गरिबांच्या आश्रयगृहात (poorhouse) राहत होती. ते ठिकाण सोडून जात असल्याचा तिला आनंद झाला होता.

पर्किन्स संस्थेतील ॲनीचे जीवन काही सोपे नव्हते. तेथील इतर मुलींपैकी बहुतांश मुली श्रीमंत कुटुंबांतील होत्या. त्या 'गरीबगृहातून' आलेल्या या मुलीशी मैत्री करण्याचा प्रयत्न करत नसत; त्यांना ॲनी गावठी आणि कधीकधी अत्यंत उद्धट वाटत असे.




ॲनीला तिच्यापेक्षा वयाने लहान असलेल्या मुलांच्या वर्गात दाखल करण्यात आले. परंतु, तिने लवकरच इतरांची बरोबरी केली आणि तिच्याच वयाच्या मुलांच्या पुढे मजल मारली. त्यानंतर, तिला शाळेची आवड निर्माण झाली. ब्रेल लिपी वाचायला शिकण्यासाठी तिने खूप मेहनत घेतली. ब्रेल ही अशी एक पद्धत आहे, ज्याद्वारे अंध व्यक्ती कागदावरील उठावदार ठिपके हाताने स्पर्श करून वाचतात.

ब्रेल वर्णमाला



त्यानंतर ॲनीला डोळ्यांच्या शस्त्रक्रियेसाठी रुग्णालयात पाठवण्यात आले. शस्त्रक्रियेनंतर तिला खूपच स्पष्ट दिसू लागले. लवकरच, ती केवळ डोळ्यांनीच नव्हे, तर आपल्या बोटांच्या साहाय्यानेही वाचू लागली. खरे तर, तिला हाती लागेल ते सर्व काही ती वाचत असे—आणि अनेकदा तर ती रात्री उशिरापर्यंत वाचन करत राही. रुग्णालयातील डॉक्टरांनी तिला काळजी घेण्याचा सल्ला दिला होता. तिचे डोळे कधीच पूर्णपणे सुस्थितीत येणार नव्हते. पण, ॲनीला जाणून घ्यायचे असे खूप काही होते! ती वाचन करतच राहिली, अगदी ती पदवीधर होईपर्यंत.



ॲनी वीस वर्षांची असताना पदवीधर झाली. ॲनीचा पदवीदान समारंभाचा दिवस हा एक अविस्मरणीय दिवस होता. ॲनी पदवीधर झाल्यानंतर लगेचच, अलाबामा येथील कॅप्टन आणि मिसेस केल्लर यांच्या हेलन नावाच्या एका लहान मुलीला शिकवण्याची संधी तिला मिळाली. ती मुलगी अंध, मूक आणि बहिरी होती. जन्मतःच ती तशी नव्हती. ती दोन वर्षांची असताना, एका आजारामुळे तिची दृष्टी, श्रवणशक्ती आणि बोलण्याची क्षमता गेली. हेलन अशा जगात राहत होती जिथे तिला काय करावे हे माहित नव्हते आणि पुढे काय होईल हेही तिला माहीत नव्हते.



त्यांनी हेलनला अलेक्झांडर ग्रॅहम बेल यांच्याकडे नेले. त्यांनी टेलिफोनचा शोध लावला होता आणि त्यांना बहिरेपणाबद्दल खूप माहिती होती.

डॉ. अलेक्झांडर ग्रॅहम बेल यांना हेलेन हुशार असल्याचे जाणवले. पर्किन्ससंस्थेला तिच्याबद्दल लिहिण्याचे त्यांनी सुचवले. कॅप्टन आणि श्रीमती केलर यांनी त्याप्रमाणे केले आणि लवकरच फक्त त्यांना ॲनी सुलिव्हन ही शिक्षिका हेलनला शिकवण्यासाठी मिळाली.



अॅनी सुलिव्हनला स्वतःची नोकरी आवडत होती. ती तरुण होती तिच्याकडे धैर्य आणि साहस होते. तिला अंधत्वचा अनुभव होता.

सर्वांत प्रथम अॅनीने लॉरा ब्रिजमनच्या बद्दल डॉ. होए यांच्या नोंदी वाचल्या. हेलनची केस लॉरा ब्रिजमनसारखीच होती. म्हणून अॅनीला तिच्याबद्दल सगळं काही जाणून घेण्याची इच्छा होती. म्हणून ती लॉराला भेटायला गेली. दोघींनी एकमेकींच्या हातावर “टॅप" करून बोलायला सुरुवात केली. वृद्ध लॉरा ब्रिजमनने लहान हेलेन केलरमध्ये रुची दाखवली. त्यांनी अॅनीच्या सोबत हेलेनसाठी एक बाहुली पाठवली.






मग ॲनी एक लांबचा प्रवासकरून टस्कंबिया, अलाबामाला पोहचली. ती थकलेली होती. तिला घराची आठवण येत होती. कोळश्याच्या इंजिनाच्या राखेने तिचे डोळे लाल झाले होते. कॅप्टन आणि श्रीमती केलर स्टेशनवर तिला घ्यायला आले होते. ॲनीला पाहून त्यांना खूप आनंद झाला. ते मागील दोन दिवसापासूनतिची वाट पाहत होते.

हेलेन घरी राहून वाट बघत होती.तिला जाणवत होते की काहीतरी वेगळे घडणार आहे. हेलनला बघितल्यावर ॲनीला तिचे दुःख आणि एकटेपणा जाणवला. पण अनीला आशा होती की एकदिवस ती नक्कीच हेलेनला या जीवनातून बाहेर काढले.





ॲनीच्या लवकरच लक्षात आले की कॅप्टन आणि रॉयल मरीनने हेलेनला कोणतेही प्रशिक्षण दिले नव्हते. ते तिला अपराधी भावनेनेच वागवत असत. ते हेलेनला खूश करण्यासाठी सर्व काही करत असत. हेलेन कोणाच्याही ताटातील अन्न खात असे, अगदी प्राण्यांच्या ताटातीलसुद्‌धा. हेलेनला असे पाहणे ॲनीसाठी वेदनादायी होते. ॲनीला लाज वाटली –ती हेलेनला एका सामान्य माणसाप्रमाणेच वागवत असे.

कुटुंबासोबतच्या तिच्या पहिल्या जेवणाच्या वेळी, ॲनी हेलनच्या बाजूला बसली. तिने त्या लहान मुलीला अन्न उचलून तोंडात कोंबण्यापासून थांबवले. मग ती रागावली आणि तिने पाय आपटले. ॲनीने कुटुंबाला खोलीतून बाहेर जायला सांगितले. हेलन पळून जाऊ नये म्हणून तिने त्यांच्यामागे दरवाजा बंद केला. हेलनने लाथ मारली आणि ॲनीवर हल्ला केला. ती किंचाळली आणि जमिनीवर लोळू लागली. ॲनीने तिला खाली बसायला लावले आणि नॅपकिन वापरून लाळ पुसायला लावून,स्वतःच्या ताटातून खायला लावले. हेलनला खायला अनेक तास लागले. ॲनी खूप थकली होती. तिने हेलनला जाऊ दिले, मग ती तिच्या खोलीत गेली आणि पलंगावर स्वतःला झोकून दिले. ती रडली.



थोड्या वेळाने ॲनीला बरे वाटू लागले. तिला एक कल्पना सुचली. ती हेलनला तिच्या कुटुंबापासून दूर घेऊन जाईल. हेलनला ॲनी आपल्यासोबत ठेवेल आणि ॲनी सांगेल तशी हेलेन वागेल. पुढच्या वेळी... ॲनीने हे कॅप्टनला सांगितले. ती आणि हेलन काही काळ एकट्या राहतील असे तिने त्यांना सांगितले. कॅप्टनला ही कल्पना आवडली नाही. ॲनी म्हणाली की हेलनवर नियंत्रण ठेवण्याचा हा एकमेव मार्ग आहे. अखेरीस ते सहमत झाले.





ॲनी हेलनला जवळच एका छोट्या घरात घेऊन गेली. हेलन ॲनीला तिची योजना पूर्ण करू देणार नव्हती. तिने ॲनीला रात्रभर झोपू दिले नाही. अखेरीस ती झोपी गेली. हेलेन तिला स्पर्श करू देत नव्हती. हेलनने तिला ढकलून दिले. खाली फेकले. हेलनने कपडे घालेपर्यंत ॲनी तिला नाश्ता देत असे.



हेलन कणखर आणि हट्टी होती. पण ॲनी तिच्यापेक्षा थोडी जास्त कणखर आणि तितकीच हट्टी होती.



एक दिवस सकाळी कॅप्टन केलर या दोघींना खिडकीमधून बघत होते. हेलेन रात्रीच्या नाईटगाऊनमध्ये जमिनीवर बसलेली होती. ॲनीला माहीत होते कॅप्टन केलर रागावलेले आहेत, हे तिला एका नोकराने सांगितले होते की कॅप्टन ॲनीला बोस्टनला परत पाठवण्याच्या विचारात आहेत. पण ॲनी स्वतःच्या योजनेवर ठाम राहिली. काही शिकवण्याआधी हेलेनवर नियंत्रण मिळवणे आवश्यक होते.



ती अडखळत बोलत असताना, ॲनी हेलनच्या हातावर शब्द लिहीत राहिली. हेलन ते पटकन शिकली. पण तिला अजून हे समजले नव्हते की प्रत्येक गोष्टीला नाव असते आणि शब्द हे नावांचे प्रतीक असतात. तिला हे माहीत नव्हते की शब्दांना अक्षरांमध्ये मांडता येते.





शेवटी हेलेनच्या वर्तनात सुधारणा दिसू लागली. ॲनीने स्वतःच्या डायरीत नोंदवले की हेलेन आता रानटी आणि उद्धट राहिली नाही. आता ती पूर्वीसारखी क्रूर राहिली नव्हती.


ॲनी तिला स्पर्श करू शकत होती, अगदी तिचा मांडीवर हातही ठेवू शकत होती. काही आठवड्यांनंतर ॲनी आणि हेलन मोठ्या घरात परत गेल्या. हेलनमधील हा बदल पाहून केलर कुटुंबाला खूप आनंद झाला. आता ती शांतपणे बसून तिच्या बाहुल्यांशी खेळायची. ॲनीने हेलेनच्या कुटुंबाला बोटांनी वर्णमाला शिकवली, जेणेकरून ते हेलनशी बोलू शकतील.



वसंत ऋतू होता आणि अलाबामात हा ऋतू खूप सुंदर असतो. ॲनी आणि हेलेनचा बहुतेक वेळ बाहेरच जात असे. त्या शेतावरील पाळीव प्राणी पाहण्यासाठी जात आणि मग तासनतास जवळपासच्या जंगलामध्ये फिरत. ॲनी हेलेनला खूप गोष्टीना स्पर्श करायला आणि वास घ्यायला लावत असे. त्यावरून ती वस्तू ओळखायला शिकवी. ॲनी, हेलनच्या तळहातावर सतत टॅप करत असे. कधीकधी हेलेनच्या मेंदू मध्ये गोष्टी आणि त्यांचे नाव मिसळून जात असे.



"हेलेन पाण्याच मग आणि पाणी या शब्दात गफलत करत होती. तेव्हा हेलेनला या दोन्ही शब्दांचा अर्थ स्पष्ट व्हावा म्हणून ॲनीच्या डोक्यात एक युक्ती आली. तिने हेलनला बाहेर हातपंपावर नेले आणि तिच्या हातात रिकामा पाण्याचा मग दिला आणि स्वतः ती हातपंपाने पाणी काढू लागली. गार पाणी बाहेर आले आणि ते हेलेनच्या हातावर पडले. तेव्हा ॲनीने हेलेनच्या हातावर लिहिले, “पाणी“!



अचानक हेलनचा चेहरा बदलला.तिच्या चेहऱ्यावर जाणीव निर्माण झाली. तिने स्वतःहून अनेक वेळा स्वतःच्या हातावर 'पाणी' लिहिले. मग तिने पंपाला हात लावला, मग जमिनीला आणि प्रत्येकवेळी ॲनीला हेलनच्या हातावर शब्द लिहण्यास सांगितले. तिला प्रत्येक गोष्टीचे नाव जाणून घ्यायचे होते. ती अगदी कमी वेळात तीस शब्द शिकली होती. ॲनीला खूप आनंद झाला. तिला वाटले की तिने अंधार भेदला आहे. तिने हेलनला तिच्या सभोवतालच्या जगाची एक किल्ली दिली होती—भाषेची किल्ली.



नंतर हेलेनने ॲनीला तिचे विचारले. ॲनीने लिहले 'टिचर' मग त्यावेळेपासून हेलेनसाठी ॲनीचे तेच नाव राहिले.

त्या रात्री हेलेनने ॲनीला मिठी मारली आणि तिची पापी घेतली. ॲनीचे हृदय आनंदाने भरून आले. तिला कळले की हेलेनचे तिच्यावर प्रेम आहे.तिचे आयुष्य हेलेनला मदत करण्यासाठी व्यतित करायचे आहे हे तिला माहीत होते.



ॲनीच्या नोकरीच्या पहिला टप्पा आता पूर्ण झाला होता. पुढची काही वर्षे तिने हेलेनला घरीच शिकवले. हेलन पटकन शिकणारी आणि उत्सुक विद्यार्थी होती. ॲनीला माहीत होते की हेलेन बराच मोठा पल्ला गाठू शकेल.

ॲनीला हे ही माहीत होते की इतर लोक हेलेनला खूप काही शिकवू शकतील. तिने केलर कुटुंबाला विचारले की ती हेलेनला पर्किन्स संस्थेत अधिक शिकण्यासाठी घेऊन जाऊ शकते का? केलर कुटुंबाचा आता ॲनीवर खूप विश्वास बसला होता, त्यांनी मान्यता दिली.

पर्किन्समध्ये, ॲनी नेहमी हेलनच्या सोबत असायची आणि तिला सतत शिकवत असे. तिने हेलनला कसे बोलावे आणि इतरांचे बोलणे कसे 'ऐकावे' हे शिकवले. ती तिच्या एका हाताची बोटे समोरच्या व्यक्तीच्या ओठांवर आणि घशावर ठेवत असे. तिला बोलण्याचे आवाज जाणवत आणि ती ते ऐकू शकत असे. ॲनीच्या कामामुळे हेलन केलर प्रसिद्ध झाली. जगभरातील लोकांनी तिच्याबद्दल ऐकले. अनेकजण तिला बघण्यासाठी, भेटण्यासाठी येऊ लागले. ॲनीकडे आता इतर अनेक नोकऱ्या होत्या. पण ती हेलनला सोडून जाणार नव्हती. कॅप्टनचा मृत्यू झाला आणि मिसेस केलर ॲनीवर अवलंबून राहू लागल्या.








ॲनीने हेलेनला महाविद्यालयात जाण्यास मदत केली. ती हेलेन बरोबर तिच्या वर्गात बसायची. ॲनी ते ते सर्व वाचे जे-जे हेलेनला शिकायचे आहे. तिचे डोळे सततच्या वाचनाने खूप दुखायचे. पदवीदान समारंभाच्या वेळी ॲनी हेलेन सोबत स्टेजवर होती. तिला तिच्या विद्यार्थिनीचा अभिमान वाटत होता, जी आता एक सुंदर स्त्री दिसत होती.

हेलेनच्या पदवीदान समारंभानंतर ॲनी खूप आनंदात होती. त्यांनी एक मोठे घर घेतले आणि त्यांच्या खूप मैत्रिणी त्यांच्याबरोबर होत्या. ॲनी स्वयंपाकघरात रमली होती. तिने लेखक - जॉन मेस्सीशी विवाह केला. पण लग्नाच्या आधी तिने खात्री करून घेतली की हेलेन कायम तिच्या बरोबर राहील. जॉन आणि ॲनीने तिचे पहिले पुस्तक लिहून संपवण्यात मदत केली. *"माझ्या जीवनाची कहाणी"* हे पुस्तक लोकांच्या आवडीचे पुस्तक झाले. जगभरच्या लोकांना ते आवडत होते.



ॲनीने हेलेनसाठी कठोर परिश्रम घेतले. ती हेलेनचे सर्व लेख आणि निबंध वाचून सुधारणा करत असी. जेव्हा हेलेन प्रवास करत असी तेव्हा ॲनी पण तिच्या सोबत जात असे. ॲनीवर घराची पूर्ण जबाबदारी होती. एकदा ॲनी आजारी पडली, तिला रुग्णालयात दाखल करावे लागले. तिच्या डोळ्यात खूप वेदना होत होत्या. यावेळी ... जॉन मेस्सी त्यांना सोडून निघून गेला.

ॲनी व हेलनला एका छोट्या घरात राहावे लागले. त्यांचे पैसे जवळजवळ संपले होते. ॲनी किंवा हेलन या दोघींनीही कधी पैसे वाचवले नव्हते. त्या नेहमी गरीब लोकांना मदत करत असत. त्या नेहमी *अमेरिकन फाऊंडेशन फॉर द ब्लाइंडला* मदत करायच्या. त्यांनी हेलनच्या पुस्तकातून आलेले पैसे पहिल्या महायुद्धात अंध झालेल्यांना दिले.





पहिला महायुद्ध संपल्यावर ॲनी आणि हेलेन हॉलीवूडमध्ये गेल्या. त्यांना हेलेनच्या जीवनावर चित्रपट करायचा होता. नंतर त्यांनी अनेक स्टेज शो केले. हे शो खूप यशस्वी झाले आणि त्यातून त्यांना भरपूर पैसे मिळाले. त्यामुळे त्या चांगले आयुष्य व्यतित करू शकल्या. याकाळात ॲनीचे डोळे खूप खराब झाले होते. ती हेलेनला तिचे दुसरे पुस्तक पूर्ण करण्यास कशीबशी मदत करत होती. नंतर ती तिचे डोळे वापरू शकली नाही, ती पूर्ण अंध झाली.



पण आता तिला मदत करायला पॉली थॉमसन होती. पॉली ही स्कॉर्चची एक आनंदी तरुण मुलगी होती, जी ॲनी आणि हेलनसोबत राहायला आली होती. ॲनीने पॉलीला हेलनसोबत मिळून काम करायला शिकवले.



.

आपल्या आयुष्याच्या अखेरीस ॲनी सुलिव्हन यांना अनेक सन्मान मिळाले. त्या पन्नास वर्षांहून अधिक काळ हेलन केलर यांच्या शिक्षिका-सहचरी होत्या. काही लोकांना वाटत होते की हेलन ॲनीशिवाय राहू शकणार नाहीत. पण 'शिक्षिका' हेलन यांच्या मृत्यूनंतरही ॲनी अनेकवर्षे सुखाने जगल्या. ॲनी सुलिव्हन यांनी हेलन यांना शिकवले होते.

समाप्त